



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com






वर्ष ३ रे | अंक : ७२३ . वा | शनिवार दि. ३० मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# प्रतापरावांना उमेदवारी,पण भाजप कार्यकर्त्यांच्या भावनांचे काय?

## शिवसेनेची खेळी की,भाजप पक्षश्रेष्ठींपर्यंत कार्यकर्त्यांचा आवाज नाही पोहोचला...





**प्रतापराव की भाजपचा कोणी उमेदवार ही चर्चा जिल्ह्यात सुरू असताना अचानक बुलढाण्याचे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी शिवसेनेकडून व एक अपक्ष असे दोन उमेदवारी अर्ज गुरुवारी दाखल केले. या घटनेने जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात चांगलीच खळबळ उडाली. अनेक जण हाच प्रश्न विचारत होते की, संजय गायकवाड हे आमदार आहेत, प्रतापराव जाधव हे लोकसभेचे उमेदवार आहेत तर मधातच गायकवाडांचा अर्ज कसा आला. या प्रकारातून शिवसेनेची अंतर्गत धूसफुस समोर आली. सध्या एकर शिवसेनेत तशीच फूट झालेली आहे. दुसरीकडे संजय गायकवाडांच्या उमेदवारीने शिंदे गटातही गट-तट असल्याचे उघड झाले. दुसरीकडे भाजप देशात, राज्यात व जिल्ह्यात आजही एकसंधच आहे. त्यामुळे शिवसेना या जागेवर दावाच कसा सांगू शकते, असा प्रश्न भाजपचे कार्यकर्तें विचारत आहेत.**

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभेची उमेदवारी अखेर शिवसेनेकडून प्रतापराव जाधव यांना जाहीर करण्यात आली. गेल्या अनेक दिवसांपासून या संदर्भात सुरू असणारे संभ्रमाचे वातावरण त्यामुळे संपले. परंतु प्रतापरावांच्या उमेदवारीमुळे मात्र अनेक प्रश्न आज निर्माण झाले आहेत. त्या प्रश्नांचे निवारण कधी होणार की नाही? बुलढाणा लोकसभा मतदारसंघ आपल्याला मिळावा, यासंदर्भात भाजप कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर होणार की नाही? भाजप पक्षश्रेष्ठी आपल्या कार्यकर्त्यांना न्याय देतील की नाही? प्रतापरावांच्या विरोधात प्रचंड रोष असल्या कारणाने भाजप कार्यकर्तें मनापसून काम करतील की नाही? आणि मतदारांचे काय? मतदार हे खरंच मनापासून पुन्हा एकदा जिल्ह्यात विकास न करणाऱ्या लोकप्रतिनिधीस स्वीकारतील की नाही, असे हे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे उमेदवारी मिळवण्यात यशस्वी झालेले प्रतापराव निवडणुकीत यशस्वी होतील का, याबाबत साशंकता अजूनही कायम आहे. गेल्या १५ वर्षांपासून प्रतापराव हे सातत्याने बुलढाणा जिल्ह्यातून लोकसभेवर निवडून जात आहेत. परंतु गेल्या १५ वर्षाच्या प्रतापरावांच्या कारकिर्दीचा धांडोळा घेतला, तर आपल्याला दिसेल की प्रतापराव म्हणजे नाव सोनाबाई अन् हाती कथलाचा वाळा. म्हणजे एकीकडे देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विकासाची इमेज आणि दुसरीकडे प्रतापरावांच्या नेतृत्वात जिल्ह्यात विकासाच्या नावाने शून्य काम, अशी स्थिती आहे. गेल्या १५ वर्षांत जिल्हा विकासाच्या बाबतीत खूपच मागे राहिला आहे. प्रतापराव हे ना जनतेचे खरे लोकप्रतिनिधी आहेत ना ते भाजप नेते व पदाधिकाऱ्यांना कोणताही सन्मान देत. त्यामुळे प्रतापरावांच्या विरोधात जशी जनतेत एकीकडे प्रचंड नाराजी आहे, तर दुसरीकडे भाजपमध्येही प्रतापरावांविषयी प्रचंड रोष आहे. गेल्या काही महिन्यांपासून भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्तें सातत्याने बुलढाणा लोकसभा यंदा भाजपनेच लढवावी, अशी तीव्र मागणी करीत आहेत. कार्यकर्त्यांच्या टोकदार झालेल्या भावना पाहून भाजप नेतृत्वाने देखील २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचाच खासदार निवडून येईल, अशी घोषणा केली होती. या घोषणेमुळे भाजप कार्यकर्त्यांच्या कानात अक्षरशः वारं शिरल्यासारखी परिस्थिती होती. भाजपचे जिल्हाध्यक्ष असो की, कोणीही पदाधिकारी प्रत्येकाने ही जागा भाजपनेच लढवावी, असा सूर निघत होता. भाजपचे लोकप्रतिनिधी व इतर वरिष्ठ नेत्यांनी कार्यकर्त्यांच्या भावना केंद्रीय पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचविल्या देखील. परंतु हे सगळे काही असताना गुरुवार २८ मार्च रोजी शिवसेनेच्या वतीने प्रतापराव जाधव यांची उमेदवारी घोषित करण्यात आली. या घोषणेंमुळे जसे जिल्ह्यातील मतदारांच्या भालनांवर पाणी फेरले गेले, तसे भाजप कार्यकर्त्यांच्या उत्साहावरदेखील विरजण पडले. प्रतापरावांनी सातत्याने भाजप नेते व कार्यकर्त्यांना सापत्न वागणूक दिली. भाजप कार्यकर्त्यांशी ते सातत्याने फटकून वागले. त्यामळेच भाजपचे अनेक पदाधिकारी हे उघडपणे प्रतापरावांच्या विरोधात भूमिका घेत आहेत. पक्षश्रेष्ठींकडेही वारंवार मागणी करीत आहेत. आताही प्रतापरावांची उमेदवारी घोषित झाली, तरी अजूनही भाजपच्या नेते व पदाधिकाऱ्यांना आपलाच उमेदवार इथे उभा राहील, असा विश्वास आहे. परंतु यासंदर्भात भाजप श्रेष्ठींनी योग्य निर्णय घेतला नाही, तर भाजप कार्यकर्त्यांचा प्रचंड हिरमोड होईल. केवळ युतीचा धर्म म्हणून भाजप सातत्याने प्रतापरावांना साथ देण्याचे काम भाजप कार्यकर्तें करीत आहेत. त्यामुळे जर या वेळी भाजप कार्यकर्त्यांकडून असहकार झाला, तर प्रतापरावांना निवडणूक जिंकणे कठीण जाईल, हे निश्चित.

**भाग-17**

गायकवाडांचा अर्ज ही शिवसेनेतील दुफळी की राजकीय खेळी संजय गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने अनेकांना आश्रच्याचा धक्का बसलेला असतानाच त्यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला की, तुम्ही नंतर उमेदवारी अर्ज मागे घेणार का? यावर गायकवाड यांनी सांगितेल की, अर्ज मागे घेण्यासाठी मी भरत नसतो. याचा अर्थ गायकवाड हे अर्ज मागे न घेण्याच्या मुद्द्यावर ठाम आहेत. परंतु याने एक सिद्ध होते की, एकतर ही शिवसेनेत माजलेली दुफळी आहे की, शिवसेनेच्या वतीने खेळली गेलेली शुद्ध राजकीय खेळी आहे. हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. भाजप कार्यकर्तें जोरकसपणे बुलढाणा लोकसभेच्या जागेची मागणी करीत आहेत. त्यामुळे भाजपच्या मागणीचे टायर पंक्चर करण्यासाठी तर ही ठरवून केली गेलेली खेळी नाही ना, अशा एक ना अनेक चर्चांना यामुळे उधाण आले आहे. आता प्रतापरावांना अधिकृत उमेदवारी घोषित झाल्यामुळे मग संजय गायकवाड दोन पावले मागे येतात का? की तेही निवडणुकीच्या रिंगणात कायम कायम राहून आपल्याच पक्षाविरोधात दंड थोपटतात? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. काहीही असले तरी या निमित्ताने जिल्ह्यातील राजकीय वातावरण पूर्णपणे ढवळून निघाले आहे, हे निश्चित.

## वीज वितरणच्या खासगी एजंटविरूध्द मलकापूर शहर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल...

**जनसंचलन/मलकापूर**

वीज वितरण कंपनीच्या खाजगी एजंटविरूध्द दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील मोहनपुरा या भागातातील शेख हाफीज शेख राऊफ यांचे विद्युत देयक प्रलंबित असल्याने विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. त्यांनी त्यांच्या भावाकडून तात्पुरत्या स्वरूपात विद्युत पुरवठा घेतला होता. यावेळी महावितरणचे खाजगी एजंट कलीम खान मतीन खान यांनी घरात घुसून घरातील महिलांना अपशब्द वापरून व अश्लील भाषेचा वापर करून विद्युत पुरवठा तुम्ही दिला कसा ? तुमचा पण विद्युत पुरवठा खंडित करण्यात येईल, असे म्हणत घरातील महिलांना व घरात उपस्थित वयोवृध्द अब्दुल हकीम अब्दुल रहीम यांना दादागिरीकडून धमकावले. त्यावेळी तुमची वरिष्ठांकडे तक्रार करणार असे म्हटले कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जा माझं कोणीही वाकडं करू शकत नाही मी महावितरण कंपनीच्या आधिकऱ्याच्या सांगण्यावरून काम करत आहे अशी धमकी वजा ताकीद कलीम खान मतीन खान म्हणाले. याप्रकरणी अब्दुल हकीम अब्दुल रहीम (वय ६३) यांनी शहर पो.स्टे.ला दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला

# उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी संदीप शेळकेंची अर्ज आशीर्वाद यात्रा!

## जिल्ह्यातील धार्मिक स्थळांना पाठवणार उमेदवारी अर्ज; ५०० पेक्षा अधिक गावात शेळकेंच्या विजयासाठी होणार पुजाअर्चा, होमहवन...



जनसंचलन/बुलढाणा

वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी बुलडाणा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने मतदारसंघात निघालेल्या परिवर्तन रथयात्रेला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. शेळके यांनी ३ एप्रिलला उमेदवारी अर्ज भरणार असल्याची घोषणा केली आहे. आता त्याला जोडून एक अनोखा कार्यक्रम वन बुलडाणा मिशनच्या वतीने आयोजित करण्यात आला असून उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी मतदारसंघात अर्ज आशीर्वाद यात्रा निघणार आहे. अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी संदीप शेळके यांच्या उमेदवारी अर्जाच्या प्रती जिल्ह्यातील पवित्र धार्मिक स्थळांना पाठवण्यात येणार आहेत. याशिवाय जिल्ह्यातील ५०० पेक्षा अधिक गावांत उमेदवारी अर्जाची पालखीतून टाळ मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढण्यात येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या रणसंग्रामाच्या लढाईत उतरण्यापूर्वी ठिकठिकाणी संदीप शेळके यांच्या विजयासाठी होमहवन, पुजाअर्चा होणार आहे. शेळके यांच्या विजयासाठी जिल्ह्यातील धार्मिक शक्तीपीठांना साकडे घालण्यात येणार आहे. उमेदवारी अर्जाला थोरा मोठ्यांचे आशीर्वाद मिळाल्यानंतर ३ एप्रिलला संदीप शेळके उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# संत्र्याने भरलेला ट्रक उलटला लुटण्यासाठी चढाओढ...

जनसंचलन/मेरा बु

अकोलाकडून पुण्याला संत्री घेऊन जाणारा ट्रकवरील वाहकाचे नियंत्रण सुटल्याने रोडच्या डिव्हायडरला धडकून ट्रकने पलट्या मारत उलटला. या अपघातात ट्रकचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने ट्रक चालक या अपघातातून बचावल. ही घटना २९ मार्च रोजी दुपारी हायवे रोडवरील अंचरवाडी फाट्या जवळ घडली अकोला, अमरावतीकडून संत्रा भरलेला ट्रक क्र के एल-७७ सी ६७२६ चा चालक शहाल मालीयेक्कल, इस्माइल मलियेक्कल, कुन्नम्मल पराकंडी, वेल्लालासेरी पीओ, मावूर व्हाया, चथामंगलम, कोझिकोडे, केरळ हा भरधाव वेगाने ट्रक चालवीत पुण्याला घेवून जात होता. हा ट्रक भरधाव वेगात असल्याने वाहकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि महामार्गाच्या कडेला असलेल्या डिव्हायडरला धडकून रोडच्या खाली जात तीन पलट्या मारत उलटला. या घटनेची माहिती अंढेरा पोलीसाना मिळताच त्यांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला असता ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसून आले. त्याच बरोबर वाहन चालक यांना विचारले असता त्यांनी सागितले की, ट्रक रोडच्या खाली जाण्याचे समजताच उडी घेवून जीव बचावला. मात्र ट्रक मधील संपूर्ण संत्र्याचा माल जमीनीवर पडल्याने घटनास्थळी जमलेले नागरिक चढाओढ करुन संत्री उचलून नेत होते. मात्र पोलिसांच्या सहकार्याने नागरीक बाजूला झाले आणि माल घटणास्थळी पडून राहिला. यावेळी अंढेरा ठाणेदार विकास पाटील, पोहेकाँ आंधळे, वाघ, उगले, राठोड, सोनकांबळे, आदींनी मदत केली.

# आमदार श्वेताताई महाले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बुलडाणा तालुका भाजपाच्या वतीने नेत्र तपासणी शिबिर संपन्न...

जनसंचलन/बुलढाणा


चिखली विधानसभा मतदारसंघाच्या दमदार लाडक्या आमदार माननीय सौ.श्वेताताई महाले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी बुलढाणा तालुक्याच्या वतीने साखळी बुद्रुक येथे मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या नेत्र आरोग्य शिबीराला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे.जास्तीत जास्त नागरिकांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली आहे .बुलढाणा येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.रवी शिंदे साहेब यांनी रुग्णांची तपासणी केली. या शिबिरामध्ये जवळपास ३०० रुग्णांची तपासणी करण्यात आली. नेत्र रोग तपासणी शिबिराच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी साखळी बुद्रुक च्या सरपंच सौ.सुनीताताई भगत होत्या. यावेळी भाजपा तालुकाअध्यक्ष ॲड.मोहनदादा पवार, युवा मोर्चा तालुकाअध्यक्ष सतीश भाकरे पाटील यांनी उपस्थित गावकऱ्यांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. सध्या वाढत्या रोग राई मध्ये डोळ्यांची काळजी घेणे अतिशय महत्वाचे झाले आहे.मात्र सामन्य वर्ग कामाच्या नादात दुर्लक्ष करतो. मात्र आमदार श्वेताताई महाले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वांची डोळ्याची तपासणी करण्यात आली आहे.बुलढाणा येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ रवी शिंदे यांनी नागरिकांची डोळ्याची तपासणी केली आहे. या नेत्ररोग शिबिराच्या यशस्वीतेसाठी तालुका उपाध्यक्ष सुरेशभाऊ चौधरी, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस गोपाल तायडे, अनुसूचित जाती जमाती जिल्हा उपाध्यक्ष राजीव नाटेकर, प्रवीणभाऊ झुंबरे, उपसरपंच शीलाताई सुरडकर, पार्वतीताई उगले, विलास रत्नपारखी, मंजुळाताई जाधव, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस नितीन उगले, युवा मोर्चा कार्यकर्ते सचिन लवंगे, संकेत देशमुख, सुधाकर चौधरी, वसंता सोनुने यांच्यासह ग्रा.पं.कार्यालय साखळी, भाजपा कार्यकर्ते व डॉ.शिंदे नेत्र रुग्णालय बुलडाणा यांच्या टीम ने मेहनत घेतली.



# सैलानी बाबा यांचा आज मानाचा संदल

जनसंचलन/ पिं. सैलानी

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सर्व जातीधर्मांच्या भाविकांचे श्रध्दास्थान फकरे तसऊब शहिशाएँ नक्शबंदी काबीले सदअहेतेराम हजरत हाजी अब्दुल रहेमान रहेमतुल्ला अलेह उर्फ सरकार सैलानी बाबा यांचा वार्षी उर्स ए मुबारक २४ मार्चपासून डोंगरद्ऱ्याकडे कपारापासून सुरु झाला आहे. आज ३० मार्च रोजी पिंपळगाव सराई येथील संदल घरामधून सरकारच्या संदल शरीफ सजवलेल्या उंटीणीवरुन लाखो भाविकांच्या उपस्थितीत निघणार आहे. रात्रभर परंपरागत मार्गाने गस्त करुन ३० मार्चला रात्री १२ वाजता सैलानी येथील समाधी स्थळावर पोहचतो. समाधीच्या स्थानानंतर भक्तीमय वातावरणातच पवित्र संदल सरकारच्या समाधीवर मानकरी मुजावर परिवार चढविणार आहे. सैलानी यात्रेमध्ये जमलेले भाविक यासाठी पिंपळगाव सराई येथील सर्व जातीधर्मांचे गावकरी यांनी संदलामध्ये भक्तीमय वातावरणासाठी व गावामध्ये संदलाच्या दर्शनासाठी आपआपल्या घरासमोर रांगोळी काढून बाबांच्या संदलासाठी मोठी तयारी केली आहे. काही गावकऱ्यांनी भाविकांसाठी मोफत फराळ व चहापाण्याची व्यवस्था केली आहे.



ज्यावेळेस संदल घरासमोर उंटीण बसते व संदल घरामध्ये मुजावर यांच्याहस्ते पुजापाठ होवून सजवलेल्या उंटीणीवर संदल शे. रफीक मुजावर, शे. हासम मुजावर, कदीर मुजावर, शे. शफीक मुजावर, महेबुब मुजावर, चाँद मुजावर, कदीर मुजावर, जहीर मुजावर, रशीद मुजावर यांच्याहस्ते चढविण्यात येतो. यावेळेस ढोलताशांच्या व वाद्यांच्या स्वरुपात तसेच फटाके यांच्या आतिषबाजीमध्ये भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेले भाविक, भक्तगण आनंद साजरा करतात. या गजरामध्ये पिंपळगाव सराई नगरी दुमदुमून जात भव्य मिरवणूक लाखो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये निघते. यावेळी उंटणीच्या दर्शनासाठी आलेले सर्व भाविक भक्त दर्शनासाठी तुटून पडतात.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्यातील मतदान केंद्रांसाठी बूथ जागरूकता समूह- जिल्हाधिकारी किरण पाटील

**जनसंचलन/बुलडाणा**

लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने मतदारांचा निवडणूक प्रक्रियेत सहभाग वाढावा आणि मतदार जाणीव जागृतीसाठी संपर्क अभियान सुरू करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व २ हजार २६५ मतदान केंद्रावर बूथ जागरूकता समूहांची स्थापना करण्यात आली आहे. यामाध्यमातून जिल्हा प्रशासन सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक प्रक्रिया सहभाग कार्यक्रम राबविणार आहे. लोकशाहीचा उत्सव समजली जाणारी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक दि. २६ एप्रिल २०२४ रोजी होत आहे. त्यादृष्टीने लोकशाही व्यवस्था मजबूत करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. मतदानाचा हक्क बजावणे ही प्रत्येक मतदाराची जबाबदारी आहे. त्यासाठी मतदारांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून व्यापक व महत्वाकांक्षी मतदार जाणीव जागृतीविषयक कार्यक्रम राबविला जाणार आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर मतदार शिक्षण व निवडणूक प्रक्रिया सहभाग कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील ४७० शहरी आणि १ हजार ७९५ ग्रामीण अशा एकूण २ हजार २६५ मतदान केंद्रावर बूथ जागरूकता समूह कार्यान्वीत करण्यात आले आहे. मतदान केंद्रासाठी नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी समूहाचे संयोजक असणार आहे. मतदारांना मतदान केंद्रावर आवश्यक ते सहकार्य करणे, मतदारांमध्ये जाणीव जागृती करणे, महिला व



दिव्यांग मतदारांचा सहभाग वाढविणे अशा विविध उद्देशाने मतदान केंद्र परिसरातील मतदारांसाठी सुलभक म्हणून हा समूह कार्य करणार आहे. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रासाठी बूथ जागृकता समूह स्थापन करण्यात आले आहे. यामुळे भयमुक्त व शांततापूर्ण रितीने जिल्ह्यातील मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी या समूहानी मतदारांना सहकार्य करावे आणि जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी वाढवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी केले आहे.

# आचारसंहिता भंग प्रकरणी तक्रार निवारण कक्ष स्थापित

**जनसंचलन/ खामगांव**

:मा.भारत निवडणूक अयोग यांचे आदेशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता १६ मार्च २०२४ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला असून निवडणुकीची अधिसुचना दि.२८ मार्च २०२४ रोजी प्रसिध्द झाली असून आचारसंहिता दि.१६ मार्च २०२४ पासुन लागू झालेली आहे व त्याच दिवशी दुपारी ३ वाजता पासून आदर्श आचार संहिताही सर्वत्र लागू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने ०५ बुलढाणा लोकसभा मतदार संघ अंतर्गत २६ खामगांव विधानसभा मतदार संघा मध्ये आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे या दृष्टिकोनातून या कार्यालयामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.तथापि दरम्यानच्या कालावधीत आचारसंहितेचा भंग झाल्याप्रकरणी नागरिकांना तक्रार दाखल करण्याकरिता उपविभागीय अधिकारी,तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी खामगांव या




कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी सभागृह,खामगांव येथे स्वतंत्र कक्ष स्थापित करण्यात आला आहे. करीता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की,आचारसंहिता भंग बाबत काही तक्रार असल्यास ०७२६३२९५६८८ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी सभागृह खामगांव येथे तक्रार निवारण केंद्र व जनसंपर्क मदतकक्ष स्थापन करण्यात आले असून तेथे व्यक्तिश:किंवा वरील दुरध्वनी क्रमांकावरून संपर्क साधावा. असे उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.रामेश्वर पुरी यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

## लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
## अमरावती विभागात तीन नामनिर्देशनपत्र दाखल

**जनसंचलन/ अमरावती**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या दुसऱ्या टप्प्यासाठी आज अमरावती विभागातील चार लोकसभा मतदारसंघामध्ये निवडणूक अधिसूचना जारी झाली असून नामनिर्देशपत्र भरण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी अमरावती लोकसभा मतदारसंघामध्ये एक व बुलडाणा लोकसभा मतदारसंघामध्ये दोन असे एकूण तीन नामनिर्देशनपत्र दाखल झाली आहेत. अमरावती लोकसभा मतदारसंघातून व्यंकटेश्वरा महा स्वामीजी उर्फ दीपक यांनी भारतीय जनता पक्षाच्यावतीने एक नामनिर्देशनपत्र दाखल केले. तसेच बुलडाणा लोकसभा मतदारसंघातून संजय रामभाऊ गायकवाड यांनी शिवसेना पक्षाच्या वतीने एक व अपक्ष म्हणून एक अशी दोन नामनिर्देशन पत्र दाखल केलीत. विभागातील अकोला आणि यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघामध्ये पहिल्या दिवशी एकही नामनिर्देशनपत्र दाखल झाले नाही. विभागातील चारही लोकसभा मतदारसंघासाठी गुरुवार, दि. २८ मार्च रोजी अधिसूचना जारी झाली आहे. ४ एप्रिल ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. तर ५ एप्रिल रोजी उमेदवारी अर्जांची छाणणी करण्यात येणार आहे. ८ एप्रिल ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. तर ४ जून रोजी मतमोजणी होवून निकाल जाहीर होणार आहे. आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत लागू राहणार आहे.







# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा काँग्रेसला पाठिंबा, ची पोलिसात तक्रार; काय प्रकार?

**वृत्तसंस्था/नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने माजी नगरसेवक जनार्दन मूद यांच्याविरोधात भारत सरकार आणि नागपूर पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. जनार्दन मून यांनी राष्ट्रीय स्वंयसेवक संघ नावाची संघटना स्थापन केली आहे. त्यांच्या या संघटनेने लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसला पाठिंबा जाहिर केला होता. नामसाधर्म्यामुळे मूळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला याचा मनस्ताप सहन करावा लागत असल्याने तक्रार दाखल करण्यात आलीय. याबाबत मिळालेली माहिती अशी की, माजी नगरसेवक जनार्दन मून यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नावानेच संघटना स्थापन केली. त्यानंतर काँग्रेसला पाठिंबा देत असल्याचं जाहीर केलं. पण संघटनेचं नाव हे मूळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नावासारखेच असल्याने मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे याविरोधात संघाचे नागपूर महानगर संघचालक राजेश लोया यांनी निवडणूक आयोग, भारत सरकार आणि पोलीस आयुक्तांकडे तक्रार केलीयय जनार्दन मून यांनी युट्युब वरील व्हिडीओ तात्काळ काढून टाकावा आणि भविष्यात ते संघाचे नाव वापरणार नाहीत, याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, मागणीही ने केली आहे. संघविरोधी मानसिकता असलेले



काही लोक समाजात संघाच्या नावाने संभ्रम पसरवतात असा आरोपही ने केला आहे. जनार्दन मून यांनी युट्युब वरील व्हिडीओ तात्काळ काढून टाकावा आणि भविष्यात ते संघाचे नाव वापरणार नाहीत, याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, मागणीही ने केली आहे. संघविरोधी मानसिकता असलेले काही लोक समाजात संघाच्या नावाने संभ्रम पसरवतात असा आरोपही ने केला आहे.

# मुलीचा पेपर झाल्यावर घरी जातांना अपघात वडील ठार तर मुलगी जखमी...

**जनसंचलन/मेहकर**

इयत्ता दहावीचा भूगोल विषयाचा शेवटचा पेपर देऊन स्वतःच्या मुलीला दुचाकी क्रमांक एमएच२८-९८८० वर बसवून घरी घेऊन जात असताना दुचाकी आणि अज्ञात वाहनाच्या धडकेत झालेल्या अपघातात वडीलांचा मृत्यू झाला असून मुलगी गंभीर जखमी झाली. ही घटना २६ मार्च रोजी दुपारी दीड ते दोन वाजेदरम्यान घडली. रिसोड तालुक्यातील गोंडाळा येथील रामेश्वर धोंडोबा गुडधे वय ४२ वर्ष हे मेहकर येथील एका खाजगी शाळेत शिकत असलेली त्यांची मुलगी कु. तृप्ती रामेश्वर गुडधे इयत्ता दहावीचा पेपर संपल्यानंतर गावी जात होते. दरम्यान परतापुर व उकळी, सुकळी दरम्यान अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेमध्ये रामेश्वर गुडधे यांचा मृत्यू झाला. तर तृप्ती गुडधे ही गंभीर जखमी झाली असून तिच्यावर खाजगी दवाखान्यात उपचार सुरू आहेत. सदर अपघातास कारणीभूत परतापूर येथील धरणातील गाळावर चालू असलेले ट्रॅक्टर




आणि टिप्परच कारणीभूत असल्याच्या आरोप मृतकाच्या पत्नीने केला असून त्याबाबतची सखोल चौकशी करून अज्ञात वाहनावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. धडक दिल्यानंतर उपचारासाठी न हलवता वाहकधारक पसार झाला होता.

# राष्ट्रवादीला ६ जागा, पण अजितदादांना तीनच उमेदवार देता येणार...







जनसंचलन/मुंबई

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारांनी अर्ज दाखल केले. पण अद्यापही महायुती आणि महाविकास आघाडीला जागावाटपाचा तिढा सोडवता आलेला नाही. महायुती आणि महाविकास आघाडीत तीन-तीन घटकपक्ष असल्यानं तिढा कायम आहे. महायुतीत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीनं भाजपकडे ९ जागा मागितल्या होत्या. पण त्यांना ६ जागा सोडण्याची तयारी दर्शवली आहे. विशेष म्हणजे त्या ६ जागांसाठीही अटी, शर्ती घालण्यात आल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीत नाराजी आहे.राष्ट्रवादीला ६ जागा सोडण्यास भाजप तयार आहे. पण त्यातील २ जागांचे उमेदवार भाजपनं निश्चित केले आहेत. दोन्ही उमेदवार भाजपचे असून ते राष्ट्रवादीच्या चिन्हावर लढतील. तर राष्ट्रवादीच्या कोट्यातील एक जागा भाजपनं मित्रपक्षाला दिली आहे. त्यामुळे अजितदादांना सहापैकी केवळ तीनच जागांवर स्वत:चे उमेदवार देता येतील. अन्य तीन जागांवरचे उमेदवार भाजपनंच निश्चित केले आहेत. हिंदुस्तान टाईम्सनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादीतही भाजपचा हस्त-क्षेप वाढला आहे. त्यामुळे अजितदादा गटात अस्वस्थता वाढली आहे.अजित पवारांनी भाजप नेतृत्त्वाकडे लोकसभेच्या ९ जागा मागितल्या होत्या. पण भाजपनं वाटाघाटीत सहा जागा देण्याचं मान्य केलं. त्यातही निम्म्या जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार देता येणार नसल्यानं पक्षात नाराजी आहे. भाजपच्या अटी, शर्ती जाचक असल्याची भावना पक्षाच्या नेत्यांमध्ये आहे. त्यामुळेच उमेदवारांची घोषणा करण्यात उशीर होत आहे.भाजपनं राष्ट्रवादीला बारामती, रायगड, शिरुर, परभणी, सातारा आणि धाराशिव या सहा जागा सोडण्याची तयारी दर्शवली आहे. यातील सातारा, धाराशिवमध्ये भाजप स्वत:चे उमेदवार देईल. साताऱ्यातून उदयनराजे भोसले, तर धाराशिवमधून माजी सनदी अधिकारी प्रविण परदेशींना तिकीट देण्याची तयारी भाजपनं केली आहे. परभणीची जागा राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांना देण्यात येणार आहे. जानकर स्वत:च्या पक्षाच्या जागेवर लढतील.अंतर्गत सर्व्हे चा दाखला देऊन एकनाथ शिंदेंना शिवसेनेचे उमेदवार बदलण्याच्या सूचना भाजपनं केल्या. त्यामुळे शिवसेनेत नाराजी आहे. पक्षात भाजप हस्तक्षेप करत असल्याची शिंदेसेनेच्या नेत्यांची भावना आहे. आता तसाच प्रकार राष्ट्रवादीत घडत आहे. अजित पवारांनी ९ जागांची मागणी केली. पण भाजपनं सहाच जागा देण्याची तयारी दर्शवली. त्यातल्याही २ जागा भाजपनं स्वत:च्या उमेदवारांसाठी घेतल्या. तर एक जागा मित्रपक्षाला दिली. त्यामुळे भाजपसोबत जाऊन काय फायदा झाला, असा प्रश्न नेत्यांना पडला आहे.

# क्षुल्लक कारणावरून दोन कुटुंबात हाणामारी

## वडगाव खंडोपंत येथील घटना परस्पर विरोधी तक्रारीवरून दोन्ही कडील आठ महिन्यांपासून वाद आहे. दरम्यान २८ जणांवर गुन्हा दाखल...

जनसंचलन/मोताळा

क्षुल्लक कारणावरून दोन कुटुंबात हाणामारी झाल्याची घटना २८ मार्च रोजी संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास वडगाव खंडोपंत येथे घडली. याप्रकरणी परस्परविरोधी तक्रारीवरून दोन्ही कुटुंबातील आठ जणांविरुद्ध बोराखेडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील वडगाव खंडोपंत येथील संगीता कळसकार यांनी बोराखेडी पोलिसात दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, त्यांच्या गावातील नितीन पुंडलिक प्रधान, नीलेश पुंडलिक प्रधान, राजू काशीनाथ प्रधान आणि निर्मला विजू वाघ यांच्यासोबत नळ घेण्याच्या कारणावरून व जागेच्या रस्त्याचे कारणावरून मागील तीन ते चार मार्च रोजी संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास निर्मला वाघ यांनी संगीता कळसकार यांच्या घरासमोरील लिंबाच्या झाडावरून इलेक्ट्रिक वायर घेतल्याने त्यांना मनाई केली असता त्यांना लोटपाट करण्यात आली.



नितीन प्रधान, नीलेश प्रधान आणि राजू प्रधान हे त्याठिकाणी आले आणि कुऱ्हाडीने हाताच्या करंगळी वर मारून फिर्यादीस जखमी केले आणि शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली अशा तक्रारीवरून बोराखेडी पोलिसांनी उपरोक्त चार जणांवर गुन्हा दाखल केला. दुसऱ्या गटातील वडगाव येथील निर्मला वाघ यांनी बोराखेडी पोलिसात फिर्याद दिली की, गावातील प्रमोद संपत सुरडकर, सिद्धार्थ संपत सुरडकर, आहे. संगीता प्रकाश कळसकर आणी ज्योती सिद्धार्थ सुरडकर यांच्यासोबत नळ घेण्याच्या आणी जागेच्या रस्त्याच्या कारणावरून तीन ते चार महिन्यांपासून वाद सुरू आहे. २८ मार्च रोजी संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास प्रमोद सुरडकर यांच्या घरासमोरून फिर्यादीने नळी टाकली असता फिर्यादीस नळी का टाकली असे म्हणत चौघांनी जीवे मारण्याची धमकी देत भाऊ नितीन प्रधान आणि नीलेश प्रधान यांना काठीने मारहाण करून जखमी केले. चापटाबुक्क्यांनी मारहाण केली अशा फिर्यादीवरून पोलिसांनी उपरोक्त चौघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास नायक पोलिस कॉन्स्टेबल अमोल खराडे हे करीत

# हातात तलवार घेऊन नाचणे भोवले; गुन्हा दाखल

जनसंचलन/ जळगाव जामोद

जळगाव जामोद तालुक्यातील सुनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीत तलवार हातात घेऊन नाचणाऱ्या युवकाविरुद्ध २९ मार्च रोजी जळगाव जामोद पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्यामुळे हातात तलवार घेऊन मिरवणुकीमध्ये नाचणे युवकाच्या चांगलेच अंगलट आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी ऋषिकेश मधुकर येऊल हा छत्रपती शिवाजी महाराज जयंती मिरवणुकीमध्ये २८ मार्च रोजी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास हातात तलवार घेऊन नाचताना दिसून आला. मिरवणुकीची कोणतीही परवानगी नव्हती, तसेच जिल्हाधिकारी यांनी आदर्श आचारसंहिता संबंधाने आदेश दिला असताना आरोपीने हातात तलवार घेऊन आदेशाचे उल्लंघन केले, अशी फिर्याद सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग इंगळे यांनी २९ मार्च रोजी दिली, त्यावरून जळगाव पोलिसांनी कलम ४,२५ शस्त्र अधिनियम तसेच सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक आनंद महाजन यांच्या मार्गदर्शनात नापोकाँ शेख इरफान पुढील तपास करीत आहेत.

# बावनबीर येथील युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

जनसंचलन/संग्रामपूर

तालुक्यातील बावनबीर येथील सुमित रवींद्र आकोटकर (२८) याने त्याच्या - राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी रात्री उशिरा घडली. युवक सुमितने रात्री दरम्यान राहत्या घरात गळफास घेतला. - कुटुंबातील लोकांनी त्याचा गळफास काढून ग्रामीण रुग्णालाय वरवट - बकाल येथे उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी त्याला मृतघोषित करून या प्रकरणाची माहिती तामगाव पोलिसांना - देण्यात आली. पोलिसांनी आकस्मिक - मृत्यूची नोंद केली. मृतकाच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई-वडील, बहीण-भाऊ आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास - संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा पोलिस करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958